# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

**प्रेस नोट** दिनांक १०/०७/२०२२

**महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेल्या गुटख्याची अवैधरित्या वाहतुक करतांना १,०१,२०,०००/- (एक कोटी एक लाख विस हजार) रू. किंमतीचा गुटख्याचा मुददेमाल चाकण पोलीसांकडुन जप्त, एका आरोपीस अटक**

दि.१०/०७/२०२२ रोजी पहाटे ०५/०० वा. चे सुमारास चाकण पोलीसांना नाशिक पुणे महामार्गावरून पुणे येथे अवैधरित्या गुटख्याचा टेंम्पो जाणार असल्याची गोपनीय बातमीदार यांचेडुन माहिती मिळाली, चाकण पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैभव शिंगारे यांनी अधिकारी व अंमलदार यांना बातमीची खात्री करून कायदेशिर कारवाई करण्याच्या सुचना व मार्गदर्शन केले. त्यावरून चाकण पोलीसांनी मिळालेल्या माहितीचे आधारे वाकी खु ।। परिसरात नाशिक पुणे महामार्गावरील रोहकल फाटयाचे स्पिड ब्रेकर जवळ सापळा रचुन टाटा कंपनीचा टेंम्पो क्र एम एच २२ ए ए १७१० याचेवर छापा टाकुन सदर टेंम्पोची तपासणी केली असता सदर टेंम्पो मध्ये आरएमडी पान मसाला व एम सुगंधी तंबाखु असलेला एकुण ९१,२०,०००/- रूपये किंमतीचा गुटख्याचा महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला माल मिळुन आला आहे. सदरचा गुटखा व वाहतुक करण्यासाठी वापरलेला टाटा कंपनीचा टेंम्पो क्र एम एच २२ ए ए १७१० असा एकुण १,०१,२०,०००/- ( एक कोटी एक लाख विस हजार रूपये ) किंमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आलेला असुन सदर माल वाहतुक करणारा आरोपी नामे गणेश विठठल भाडळे वय ३२ वर्षे, रा. कोयाळी ता. खेड जि. पुणे यास अटक करण्यात आलेली असुन त्याचे विरोधात चाकण पोलीस स्टेशन गुरनं १११५/२०२२ भादवि कलम ३२८, २७२,२७३,१८८, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास चालु आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त, श्री. अंकुश शिंदे साहेब, अपर पोलीस आयुक्त, श्री. संजय शिंदे, पोलीस उप आयुक्त, परिमंडल-१ श्री. मंचक इप्पर, सहा. पोलीस आयुक्त, प्रेरणा कट्टे यांचे सुचना व मार्गदर्शना खाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैभव शिंगारे, पोलीस निरीक्षक अनिल देवडे, सपोनि प्रसंन्न ज-हाड, सपोनि विक्रम गाकयवाड, पोसई निलेश चव्हाण, सफौ सुरेश हिंगे, पोहवा संदिप सोनवणे, पोना भैरोबा यादव, हनुमंत कांबळे, निखील शेटे, पोकॉ चेतन गायकर , नितीन गुंजाळ, प्रदिप राळे, निखील वर्पे यांनी केलेली आहे. सदर गुन्हयाचा अधिक तपास सपोनि विक्रम गायकवाड हे करीत आहेत.

**(मंचक इप्पर )**
**पोलीस उप आयुक्त**
**परिमंडळ-१, पिंपरी चिंचवड**